**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १६ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **नागपुरात हिवाळी अधिवेशनाला प्रारंभ; 35 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर.**
2. **ओबीसी समाजासाठी सर्वाधिक काम महायुती सरकारनं केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.**
3. **विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचं अमेरिकेत निधन, देशभरातून शोक व्यक्त.**
4. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला दैदीप्यमान इतिहास लाभल्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांचे गौरवोद्गार.**
5. **विदर्भात थंडीची लाट, उद्या गोंदिया जिल्ह्यासाठी येल्लो अलर्ट जारी.**

---------------------------

**विधानसभा**

**राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून नागपुरात सुरुवात झाली. कामकाज सुरू होण्याआधी विरोधकांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर ईव्हीएम विरोधात निदर्शने केली-**

***जिस प्रकार इस महाराष्ट्र मे सरकार आयी, जिस प्रकार जनमत लोकसभा इलेक्शन मे था, उससे थोड़ा कम ज्यादा जनमत हो सकता है, लेकिन जिस प्रकार भारतीय जनता पार्टी और उनकी जो सहकारी पार्टी है उनको जिस प्रकार जनमत आया है वो ईव्हीएम के वजह से आया है ऐसी हमारी भावना है। इस प्रकार ये सरकार जो आई है, ये ईव्हीएम सरकार. है जनमत की सरकार नहीं है, और इसलिए आने वाले समय मे इलेक्शन बैलेट पर हो इस प्रकार की लडाई हम लड़नेवाले है। और इस लड़ाई मे आज हमने विधिमंडळ का अधिवेशन जो महाराष्ट्र मे होने जा रहा है, उसमे आज हमने आंदोलन किया है।***

**विधानसभेच्या कामकाजाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांचा परिचय सभागृहाला करुन दिला. त्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी दोन्ही सभागृहात ३५ हजार ७८८ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. पुरवणी मागण्यांमध्ये ३ हजार ५० कोटी रुपये मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पंधराशे कोटी, मोदी आवास घरकुल योजनेसाठी**

साडे बाराशे कोटी रुपये, सहकारी साखर कारखान्यांना कर्जाकरता सुमारे बाराशे कोटी रुपये यासारखे खर्च प्रस्तावित आहेत. सर्वाधिक सुमारे साडे ७ हजार कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले जाणार आहेत. विधानसभेच्या कामकाजाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

*विधानसभेमध्ये आज महाराष्ट्राचे माजी राज्यपाल दिवंगत एस एम कृष्णा आणि दिवंगत सदस्य दिनकरराव भाऊसाहेब जाधव यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. विधानसभा सदस्य नाना पटोले यांनी बीड आणि परभणी येथील घटनांबाबत मुद्दा उपस्थित केला मात्र विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्थानग प्रस्तावा दरम्यान याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल असं सांगितलं. दरम्यान बीड आणि परभणी येथील घडलेल्या दोन्ही घटना गंभीर असून, त्याबाबत सविस्तर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून विरोधी पक्षाने राजकारण न करता अशा घटना घडू नयेत यासाठी चांगल्या सूचना मांडाव्यात अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत व्यक्त केली. आज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेच्या पटलावर आठ विधेयक मंडळी. दरम्यान शोक प्रस्तावानंतर विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.*

----------------------------

विधानपरिषद

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात वंदे मातरम आणि 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने विधान परिषद कामकाजास सुरुवात झाली. विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीड आणि परभणी हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित केला. सरकारने याबाबत कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली. त्यावर या संदर्भात चर्चा करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं. त्यानंतर उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी शोक प्रस्ताव सादर केला. आदरांजली अर्पण केल्यावर सभागृहाचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.

----------------------------

फडणवीस पत्रकार परिषद

काँग्रेसला ओबीसी बाबत बोलण्याचा कुठलाही अधिकार नाही. महाराष्ट्रामध्ये ओबीसी वर्गासाठी सर्वात जास्त काम महायुती सरकारने केलं असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी केलं. ते आज नागपूर विधिमंडळ परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते-

*महाराष्ट्रातील OBC मंत्रालय मी मुख्यमंत्री असताना स्थापन झाले. महाराष्ट्रामध्ये OBC समाजाकरिता ४८ GR आमच्या सरकारने काढले मी आणि*

*शिंदे साहेब असताना. ५२ हॉस्टेल असतील, शिक्षणाची व्यवस्था असेल, PHD ची व्यवस्था असेल, वेगवेगळ्या प्रकारे विदेशी शिक्षणाची व्यवस्था असेल, रोजगाराची व्यवस्था असेल, सगळ्या बाबतीतलं काम हे महायुती सरकारनं, आम्ही केलेलं आहे आणि आजही आपण पाहू शकतो मोदी साहेबांचं मंत्रिमंडळ असेल किंवा आमचं मंत्रिमंडळ असेल सर्वाधिक OBC मंत्री आमच्या मंत्रिमंडळात पाहायला मिळतात.*

---------------------------

भुजबळ/मुनगंटीवार

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री छगन भुजबळ यांचा राज्यमंत्री मंडळात समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे आज नाशिकमध्ये आंदोलने करण्यात आली. भुजबळ हे सातव्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. ज्येष्ठत्वामुळे त्यांचं मंत्रीपद अटळ मानलं जात होतं . मात्र त्यांना काल शपथविधीच्या वेळी मंत्रीपद नसल्याचं स्पष्ट झाल्याने कार्यकर्ते नाराज झाले आहेत. दरम्यान भाजपचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा देखील मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला नाही. याबाबत मुख्यमंत्र्यांना विचारलं असता 'पक्ष आणि सरकार हे दोन्ही महत्त्वाचे असून काहींना पक्षाची जबाबदारी देण्यासाठी मंत्रिमंडळात सामावून घेतलं जात नाही', असं ते म्हणाले.

---------------------------

राज्यसभा

काँग्रेसनं राज्यघटनेत ज्या सुधारणा केल्या त्यालोकशाहीला बळकट करण्यापेक्षा स्वत:च्या कुटुंबाला मदत म्हणून आणि सत्ता वाचवण्यासाठी केल्या, असा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आज केला. राज्यसभेत आज प्रश्नोत्तरांचा तास आणि शून्य प्रहराचं कामकाज बाजूला ठेवून राज्यघटनेच्याअमृतमहोत्सवी वाटचालीवर विशेष चर्चा सुरू आहे. या चर्चेची सुरुवात सितारामन यांनी केली. घटनासमितीच्या सदस्यांप्रति आदर व्यक्त करत त्यातल्या १५ महिला सदस्यांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. भारताची राज्यघटना किती मजबूत आहे याचा अनुभव देशानं घेतल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकार राज्यघटनेला कमकुवत करत असल्याचं मत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी चर्चेदरम्यान मांडलं. दरवर्षी दोन कोटी रोजगार देण्याच्या आश्वासनाची पूर्तता करण्यात सरकार अपयशी झाल्याचं ते म्हणाले. तत्पूर्वी नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली. त्यात भाजपाच्या ३, तेलगु देसम पार्टीच्या २, तर तृणमूल काँग्रेसाच्या एका सदस्याचा समावेश आहे.

---------------------------

जाकीर हुसैन- निधन/शोक संदेश

प्रख्यात तबलावादक उस्ताद जाकीर हुसैन यांचं अमेरिकेत निधन झालं,ते ७३ वर्षांचे होते. हृदयविकाराशी संबंधित त्रासामुळे त्यांना सॅनफ्न्सिस्को इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. उपचारादरम्यान रात्री उशीरा त्यांचं निधन झालं. “नऊ मार्च १९५१ रोजी मुंबईत जन्मलेले जाकीर हुसैन यांनी त्यांचे वडील उस्ताद अल्लारखां यांच्याकडून तबला वादनाचे धडे घेतले आणि वयाच्या बाराव्या वर्षापासून आपल्या सहा दशकांच्या कारकिर्दीत तबला वादनाला नवी ओळख मिळवून दिली. जाकीर हुसैन यांना १९८८ साली भारत सरकारने पद्मश्री सन्मान प्रदान केला, हा सन्मान मिळालेले ते सर्वात तरुण व्यक्ती ठरले. त्यानंतर पद्मभुषण आणि पद्मविभुषण सन्मानाने त्यांचा गौरव करण्यात आला. संगीत क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर मानाच्या ग्रॅमी पुरस्कारांवर त्यांनी पाच वेळा नाव कोरलं, यापैकी तीन पुरस्कार त्यांना याच वर्षी मिळाले होते. दरम्यान प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याच्या ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने संबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका समेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, अशा शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या आहेत. उस्ताद झाकीर हुसैन हे भारतीय शास्त्रीय संगीतविश्वात क्रांती घडवणारा खरा प्रतिभावंत म्हणून कायम स्मरणात राहतील. त्यांनी आपल्या प्रतिभेने लाखो श्रोत्यांना मंत्रमुग्ध तर केलंच पण तबल्याला जागतिक स्तरावर प्रसिद्धीही मिळवून दिली, अशा शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात तीव्र शोक व्यक्त केला आहे. तर प्रयोगशीलता, कठोर परिश्रम, सशक्त वादनशैल आणि अंगभूत प्रतिभा यांमुळे उस्ताद झाकीर हुसैन यांनी आपल्या तबलावादनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं, अशा शब्दात महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी आदरांजली वाहिली आहे.

---------------------------

नागपूर विद्यापीठ दीक्षांत सोहळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला देदीप्यमान इतिहास लाभला असून या विद्यापीठाने भारताचे माजी राष्ट्रपती आणि सरन्यायाधीश मोहम्मद हिदायतउल्ला , माजी पंतप्रधान नरसिंहराव ,माजी सरन्यायाधीश शरद बोबडे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, माजी मंत्री श्रीकांत जिचकार यांसारखे विद्यार्थी दिले आहेत. या विद्यापीठाने आपल्या शतक पूर्ती वर्षानिमित्त इंडियन सायन्स काँग्रेस, इंडियन फार्मसी काँग्रेससारखे कार्यक्रम यशस्वीरित्या राबवले असं प्रतिपादन राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती सी.पी.राधाकृष्णन यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या 112 व्या दीक्षांत समारंभा प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून

बोलताना केलं. या दीक्षांत समारंभामधे 1 लाख 3 हजार 303 विद्यार्थ्यांना पदवी/ पदविका प्रदान करण्यात आल्या.

---------------------------

वार्तालाप

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पत्र सूचना कार्यालय नागपूरच्या वतीने निमंत्रित पत्रकारांसाठी उद्या एक दिवसीय प्रसार माध्यम कार्यशाळा - वार्तालाप'चं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी 10:30 वाजता चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते आणि जिल्हा परिषद चंद्रपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. उद्घाटन सत्रा नंतर ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प संचालक, जितेंद्र रामगावकर हे मुख्य भाषण करतील. केंद्र सरकारच्या योजना आणि कार्यक्रमांबाबतच्या माहितीच्या प्रसाराचे कार्य करणारे पत्र सूचना कार्यालय हे थेट जनतेपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार आणि प्रसारमाध्यम यांच्यातील मुख्य दुवा आहे. 'संवर्धन आणि विकास या संदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यातील प्रयत्न' या संकल्पनेशी निगडीत हा वार्तालाप असणार आहे.

---------------------------

हवामान

हवामान: उत्तरेकडील राज्यांमधून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे जिल्ह्यात सध्या थंडीची लाट आली असून, विदर्भाला कडाक्याच्या थंडीचा सामना करावा लागतो आहे. गेल्या काही दिवसांपासून अकोल्याचा पारा झपाट्यानं खाली आला असून विदर्भात सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं सात पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं. त्या पाठोपाठ नागपूर इथं आज आठ पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. गडचिरोली आणि अकोला इथं नऊ अंश सेल्सिअस तर अन्य सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान 10 ते 11 अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. विदर्भात 48 तास शीतलहरीचा ईशारा प्रादेशिक हवामान विभागातर्फे देण्यात आला आहे. गोंदिया जिल्ह्यासाठी उद्या थंडीच्या त्रीव्रतेचा येल्लो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

---------------------------

लोकराज्य दुर्मिळ अंक

लोकराज्य दुर्मिळ अंक हे माहितीचा अमुल्य ठेवा असून त्याचं जतन आणि संवर्धन होण्याकरिता या अंकांचं डिजीटायजेशन व्हावं, अशा सूचना माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी आज

**विधानभवन परिसरात लावण्यात आलेल्या लोकराज्य दुर्मिळ अंक प्रदर्शनाच्या उद्घाटना प्रसंगी दिल्या. नागपूर-अमरावती विभाग संचालक कार्यालयाच्या वतीनं लावण्यात आलेल्या या प्रदर्शनास मंत्री, आमदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन राज्याच्या गौरवशाली परंपरेच्या माहितीचा ठेवा असणाऱ्या या प्रदर्शनाचं कौतुक केलं.**1964 **पासूनचे अंक या प्रदर्शनात लावण्यात आले आहेत.**

**---------------------------**